# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 08 April 2025

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०८ एप्रिल २०२५ दुपारी १.०० वा.

****

प्रधानमंत्री मुद्रा योजनेला आज दहा वर्ष पूर्ण होत आहेत. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ३२ लाख कोटी रुपयांची ५२ कोटींहून अधिक कर्जं वितरित करण्यात आली आहेत. आर्थिक समावेशन आणि उद्योजकांच्या सक्षमीकरणासाठी सूक्ष्म आणि लघु उद्योजकांना १० लाखांपर्यंतचं तारणमुक्त कर्ज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं ही योजना सुरु करण्यात आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज या योजनेच्या लाभार्थ्यांशी आपल्या निवासस्थानी संवाद  साधला. ही योजना लोकांची स्वप्नं सत्यात उतरवण्यासाठी कशी उपयोगी पडत आहे, हे सांगून त्यांनी या लाभार्थ्यांचं अभिनंदन केलं. युवकांनी, नोकरी शोधणारे न बनता नोकरी देणारे बनावं आणि देशाचा युवावर्ग सशक्त व्हावा, या उद्देशानं ही योजना राबवली जात असल्याचं त्यांनी सांगितलं. या योजनेच्या लाभार्थ्यांपैकी सत्तर टक्के लाभार्थी या महिला असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

यावेळी या योजनेच्या लाभार्थ्यांनीही आपले अनुभव सांगत, या योजनेमुळे आयुष्य पूर्णपणे बदलल्याचं सांगितलं. या योजनेची जागतिक स्तरावरही प्रशंसा झाली असून, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनंही, भारतात उद्योजकतेला वाव मिळण्यात या योजनेचं असलेलं महत्व मान्य केलं आहे.

****

देशभरातल्या कुपोषण समस्येचं निराकरण करण्यासाठी सरकारनं सुरू केलेल्या पोषण पंधरवडा या योजनेचं सातवं वर्ष महिला आणि बाल कल्याण मंत्रालय आजपासून साजरं करत आहे. या वर्षी या पंधरवड्यात चार मुख्य विषयांवर लक्ष केंद्रित केलं जात आहे, त्यात नवजात शिशुंची पहिल्या हजार दिवसात योग्य देखभाल करणं,

पोषण ट्रॅकरच्या लाभार्थी मोड्यूलचा प्रचार आणि प्रसार करणं, कुपोषणाला प्रभावीपणे अटकाव करणं आणि लहान मुलांमधल्या लठ्ठपणाच्या समस्येला दूर करण्यासाठी आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन देणं, यांचा समावेश आहे. गर्भवती आणि स्तन्यदा माता, किशोरी आणि सहा वर्षांपेक्षा कमी वयाच्या बालकांच्या पोषणात सुधारणा करणं, हा  पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या या पोषण अभियानाचा उद्देश आहे.

****

तमाशा कलावंतासमोरील आव्हानांचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांची घेतला आहे. एका महिन्यात या समितीने अहवाल सादर करावा असे निर्देशही त्यांनी विभागाला दिले आहेत. लोकनाट्य कलाकार आणि कला केंद्र संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी काल मुंबईत शेलार यांची भेट घेतली, त्यानंतर त्यांनी ही घोषणा केली.

****

गृहनिर्माण राज्यमंत्री डॉक्टर पंकज भोयर यांनी मुंबईत वांद्रे इथल्या म्हाडा मुख्यालयाला काल भेट देऊन, मुंबई गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास मंडळाच्या विविध योजनांचा आढावा घेतला. प्रकल्प अंमलबजावणीचे टप्पे वेळेत पूर्ण व्हावेत, लाभार्थ्यांना नियमानुसार घरं मिळावीत आणि पुनर्वसनाशी संबंधित सर्व प्रक्रिया सुसूत्रपणे पार पडाव्यात, यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीनं करावी, असे निर्देश भोयर यांनी अधिकाऱ्यांना यावेळी दिले.

****

श्री क्षेत्र पंढरपूर इथं चैत्र एकादशीच्या निमित्तानं आज पहाटे विठ्ठल आणि रुक्मिणीची नित्य पूजा पार पडली. चैत्र यात्रेनिमित्त राज्याच्या विविध भागातून सुमारे तीन लाख भाविक पंढरपुरात दाखल झाले आहेत. आज पहाटे हजारो भाविकांनी चंद्रभागेमध्ये स्नान केलं.

****

नांदेडमध्ये माळटेकडी परिसरातल्या एका कुशन अँड फर्निचर गोदामाला आज सकाळी आग लागली. यावेळी अग्निशमन दलानं या गोदामात असलेल्या सहा लोकांना सुखरूप बाहेर काढून आग आटोक्यात आणली, मात्र या दुर्घटनेत मोठी आर्थिक हानी झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या देवगिरी किल्ला परिसरातही वणवा पेटल्याचं वृत्त आहे.

****

अकोला इथं काल झालेल्या जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत एक हजार २३८ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे विविध ९५ उद्योग व्यवसायांशी सामंजस्य करार करण्यात आले. अकोल्याचे जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी ही माहिती दिली. गुंतवणुकीसाठी जिल्ह्यात पोषक वातावरण तयार झालं असल्याचं ते यावेळी म्हणाले.

****

छत्रपती संभाजीनगर इथं महावितरणच्या लकी डिजिटल ग्राहक योजनेचा पहिला लकी ड्रॉ काल ऑनलाईन पद्धतीने काढण्यात आला. या ‘लकी ड्रॉ’मधून पहिल्या क्रमांकासाठी ६५१ तर दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकासाठी प्रत्येकी तेराशे दोन विजेते जाहीर करण्यात आले. विजेत्या ग्राहकांची यादी महावितरणच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. महावितरणने वीजबिल ऑनलाईन भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढवण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे.

****